**ठळक बातम्या**

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची अंगोलाच्या अध्यक्षांबरोबर महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा / दोन सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या

- बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्याच्या प्रचाराच्या तोफा थंडावल्या

- महाराष्ट्रातल्या २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरायला उद्यापासून सुरुवात होणार

**आणि**

- कोग्नीवेरा आंतरराष्ट्रीय पोलो विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारताने केला अर्जेंटिनाचा पराभव

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज अंगोलाचे अध्यक्ष जोआओ लॉरेन्सो यांच्याशी भारत आणि अंगोला यांच्यातल्या द्विपक्षीय संबंधांच्या विविध पैलूंवर चर्चा केली. या चर्चेदरम्यान राष्ट्रपती मुर्मू यांनी दोन्ही देशांच्या सामाईक हिताच्या विविध क्षेत्रांमधलं सहकार्य वाढवण्यावर भर दिला. उत्तम संसदीय कार्यपद्धती, कृषी, विशेषतः बियाणं आणि खतं, तेलसाठ्यांचा शोध आणि शुद्धीकरण, दळणवळणाच्या पायाभूत सुविधा, दुर्मिळ खनिजं आणि हिऱ्यावर प्रक्रिया या क्षेत्रांकडे त्यांनी लक्ष वेधलं. या क्षेत्रांमध्ये अंगोलाबरोबर काम करायची भारताची तयारी असल्याचं राष्ट्रपतींनी सांगितलं. यावेळी काही सामंजस्य करारांवरही स्वाक्षऱ्या झाल्या. याविषयी बोलताना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या,

***होल्ड... बाईट- द्रौपदी मुर्मू* (२६ सेकंद)**

अंगोलाच्या सुवर्णमहोत्सवी स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमात सहभागी होत असल्याचा आपल्याला खूप आनंद असल्याचं प्रतिपादन राष्ट्रपती मुर्मू यांनी केलं आणि १४० कोटी भारतीयांच्या वतीनं अंगोलाच्या नागरिकांना शुभेच्छा दिल्या. भारत आणि अंगोला यांच्यातल्या द्विपक्षीय संबंधांना यंदा ४० वर्षं पूर्ण झाल्याच्या निमित्तानं या संबंधांना वेगळं महत्त्व असल्याची बाब त्यांनी अधोरेखित केली.

**<><><><><>**

यश मिळवायचं असेल तर स्वतःला झोकून देत कठोर परिश्रम करायला हवेत, असं उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी म्हटलं आहे. ते आज कर्नाटकात म्हैसूर इथं, जे. एस. एस. अकॅडमी ऑफ हायर एज्युकेशन, या शिक्षणसंस्थेच्या पदवीदान समारंभात बोलत होते. इतरांशी तुलना न करता स्वतःच्या प्रगतीवर लक्ष केंद्रित करण्याचं आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केलं.

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्याच्या प्रचाराच्या तोफा आज थंडावल्या. आज शेवटच्या दिवशी राष्ट्रीय लोकशाही आघाडी आणि महागठबंधनच्या प्रमुख नेत्यांनी आपल्या भाषणांमधून मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला. याविषयी अधिक जाणून  घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**- *- होल्ड व्हीसी - -* (१. ११ सेकंद)**

*(बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यानंतर दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्याचा प्रचारही जोरदार झाला. सर्व पक्षांचे नेते आणि स्टार प्रचारकांनी मतदारांना आपली बाजू पटवून देण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला. यात दोन्ही बाजूंनी आरोप प्रत्यारोपही झाले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, काँग्रेसचे वरिष्ठ नेते राहुल गांधी यांच्यासह संयुक्त जनता दलाचे अध्यक्ष नितीशकुमार आणि राजद नेते तेजस्वी यादव यांनी अनेक प्रचारसभा घेऊन मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला. आजही ठिकठिकाणी सर्व प्रमुख नेत्यांच्या प्रचारसभा झाल्या.*

*संयुक्त जनता दलाचे अध्यक्ष आणि मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी आज औरंगाबाद, गया आणि कैमुर जिल्ह्यात अनेक सभांना संबोधित केलं. रालोआ सरकारमधे सर्वांचं हित विचारात घेऊन निर्णय झाले. पुन्हा एकदा रालोआ सरकार निवडून दिलं तर विकासकामं अधिक जलद गतीने होतील, असं नितीशकुमार म्हणाले.*

*काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पुर्णिया आणि किशनगंज इथं महाआघाडीच्या उमेदवारांसाठी प्रचारसभा घेतली. राजद नेते तेजस्वी यादव यांनी भभुआ, रोहतस आणि औरंगाबाद जिल्ह्यांमधे अकरा सभांना संबोधित केलं. आपल्या सतरा महिन्यांच्या कार्यकाळात पाच लाख तरुणांना रोजगार दिला. महाआघाडीचं सरकार आलं तर प्रत्येक कुटुंबात एक जणाला नोकरी देऊ असं आश्वासन यादव यांनी दिलं. जनसुराज्य पक्षाचे नेते प्रशांत किशोर यांच्यासह बसपा आणि एमआयएम च्या नेत्यांनीही आपापल्या उमेदवारांसाठी प्रचारसभा घेतल्या. )*

दरम्यान, मतदानाच्या पहिल्या टप्प्यात व्हीव्हीपॅट पावत्या उघड्यावर आढळल्याप्रकरणी सहायक निवडणूक अधिकाऱ्याला निलंबित करण्यात आलं आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल झाला असून चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. दुसऱ्या टप्प्यात १२२ मतदारसंघासाठी ११ नोव्हेंबरला मतदान होणार आहे. १ हजार ३०२ उमेदवार रिंगणात उतरले असून तीन कोटी सत्तर लाख मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. १४ नोव्हेंबरला बिहार विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर होणार आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरायला उद्यापासून सुरुवात होणार आहे. १७ नोव्हेंबरपर्यंत हे अर्ज भरता येतील. अर्जांची छाननी १८ नोव्हेंबर रोजी होणार आहे. अर्ज मागे घ्यायची शेवटी मुदत २१ नोव्हेंबर ही असून उमेदवारांची अंतिम यादी २६ नोव्हेंबर रोजी जाहीर केली जाणार आहे. या निवडणुकीत एकंदर १ कोटी ७ लाख ३ हजार ५७६ मतदार, ६ हजार ८५९ सदस्य आणि २८८ अध्यक्षांची निवड करतील. निवडणुकीसाठीचं मतदान २ डिसेंबर रोजी, तर मतमोजणी ३ डिसेंबर रोजी होणार आहे.

**<><><><><>**

देशभरातल्या आठ विधानसभा मतदारसंघातल्या पोटनिवडणुकीच्या प्रचाराची मुदत आज संपली. जम्मू आणि काश्मीरमध्ये बडगाम आणि नागरोटा, राजस्थानमध्ये आंता, झारखंडमध्ये घाटसिला, तेलंगणामध्ये ज्युबिली हिल, पंजाबमधे तरनतारन, ओदिशामधे नुआपाडा आणि मिझोराममधे डम्पा मतदारसंघात ११ नोव्हेंबरला मतदान होणार आहे. या निवडणुकीची मतमोजणीही बिहार विधानसभा निवडणुकीसोबत १४ नोव्हेंबरला होणार आहे.

**<><><><><>**

जयपूरच्या पोलो ग्राउंडवर झालेल्या २०२५च्या कोग्नीवेरा आंतरराष्ट्रीय पोलो विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारतानं जगात अव्वल स्थानी असलेल्या अर्जेंटिनाचा १०-९ असा पराभव केला. या ऐतिहासिक विजयानं पोलोची जन्मभूमी असलेल्या भारतात, या क्रीडाप्रकाराच्या विकासाच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. सवाई पद्मनाभ सिंह आणि कर्णधार सिमरन सिंह शेरगिल यांच्या नेतृत्वाखालच्या भारतीय संघानं उत्तम कामगिरी केली. भारतात पोलोचा समृद्ध वारसा असूनही, या खेळाला मर्यादित क्लब, जास्त खर्च आणि कमी प्रायोजकत्व अशा आव्हानांचा सामना करावा लागतो. मात्र, या विजयामुळे युवा खेळाडू या क्रीडा प्रकाराकडे आकर्षित होतील, आणि शासकीय पातळीवर या खेळाच्या विकासासाठी प्रयत्न होतील, अशी आशा निर्माण झाली आहे.

**<><><><><>**

उत्तराखंड राज्याचा आज २५वा स्थापना दिवस आहे. यानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत देहरादून इथं विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आलं होतं. या कार्यक्रमात प्रधानमंत्री मोदी यांनी विशेष टपाल तिकिटाचं प्रकाशन, उत्तराखंडमधल्या आठ हजार कोटी रुपयांच्या विकास कामांचं भूमीपूजन आणि उद्घाटन केलं. तसंच प्रधानमंत्री पीकविमा योजनेतून २८ हजारांपेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ६२ हजार कोटी रुपये हस्तांतरित केले. गेल्या २५ वर्षांत उत्तराखंडचं चित्र पूर्णपणे पालटलं असून पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य, ग्रामीण विकास यात भरीव कामगिरी केली आहे. राज्यात दोन लाख कोटी रुपये खर्चाच्या विकासकामांवर काम सुरू आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

भारतातून आणल्या गेलेल्या भगवान गौतम बुद्धांच्या पवित्र अवशेषांचं आदरयुक्त भावनेनं स्वागत केल्याबद्दल, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भूतानच्या जनतेची आणि नेतृत्वाची प्रशंसा केली आहे. भगवान बुद्धांचे हे अवशेष शांतता,

करुणा आणि सौहार्द याचा कालातीत संदेश देत असल्याचं त्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. भगवान बुद्धांची शिकवण हा भारत आणि भूतान यांच्यातल्या सामायिक अध्यात्मिक वारशाचा पवित्र दुवा असल्याचं यात म्हटलं आहे.

**<><><><><>**

दिल्ली-राष्ट्रीय राजधानी क्षेत्रात हवेची गुणवत्ता अतिशय खराब पातळीवर घसरली आहे. आज दुपारी ४ वाजता गुणवत्ता निर्देशांक ३७० इतका असल्याची माहिती केंद्रीय प्रदूषण नियमन मंडळानं दिली आहे.

**<><><><><>**

प्रशांत महासागरात झालेल्या ६ पूर्णांक ७ रिक्टर तीव्रतेच्या भूकंपानंतर, जपाननं इवाते प्रांतासाठी त्सुनामीचा इशारा दिला आहे. या भूकंपामुळे काही भागात वीजपुरवठा खंडित झाला असून, काही काळासाठी स्थगित करण्यात आलेली शिंकान्सेन बुलेट ट्रेन सेवा थोड्या काळानंतर पुन्हा सुरू करण्यात आली. सानरिकू किनाऱ्याजवळ सुमारे १० किलोमीटर खोलीवर झालेल्या या भूकंपामुळे एक मीटरपर्यंत उंच त्सुनामीची शक्यता आहे अशी माहिती जपानच्या हवामान खात्यानं दिली आहे.

**<><><><><>**

न्यूझीलंडच्या टोंगारिरो राष्ट्रीय उद्यानात कालपासून लागलेल्या आगीत आतापर्यंत १६ शे हेक्टर क्षेत्रावरची वनसंपदा जळून नष्ट झाली आहे. या आगीत आतापर्यंत कोणतीही जीवित अथवा वित्त हानी झाल्याचं वृत्त नाही. विमानं, हेलिकॉप्टर आणि जमिनीवरून पाण्याचे फवारे मारून आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न सुरु आहेत. आगीचं कारण अद्याप समजलं नसल्याचं स्थानिक सूत्रांनी सांगितलं.

टोंगारिरो, हे न्यूझीलंडचं पाहिलं राष्ट्रीय उद्यान असून, ते ८० हजार हेक्टर क्षेत्रावर पसरलं आहे. नैसर्गिक आणि सांस्कृतिक महत्त्वामुळे त्याचा समावेश युनेस्को च्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीत करण्यात आला आहे.

**<><><><><>**

अमेरिकेत सरकारी कामकाज बंद पडल्याचा परिणाम हवाई वाहतूक सेवेवर झाला असून सुमारे सतराशे उड्डाणं रद्द करण्यात आली आहेत. अमेरिकेतल्या प्रमुख विमानतळांवरच्या उड्डाणांमधे ४ टक्के कपात करण्यात आली आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीनं उड्डाणांची संख्या कमी करणं आवश्यक असल्याचं अधिकाऱ्यांचं म्हणणं आहे. शटडाऊनच्या तिढ्यावर तोडगा निघाला नाही तर उड्डाणकपात १५ ते २० टक्के होई शकते असं अमेरिकेचे वाहतूक मंत्री शॉन डफी यांनी म्हटलं आहे.

**//<><><><><>//**